सोबत :- उपरोक्त संदर्भाचे विषयाची प्रत पोलीस नोटीस सोबत ई मेल वर जोडण्यात आली आहे.

**परिच्छेद क्र.२१० : संदर्भ :- १) मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. DGP १६/१६/२०२४ DESK १६ मुंबई,दिनांक २४/०९/२०२६**
**२) जा.क्र.पोआ/नमुं/पशा/संकिर्ण/पोलीस स्मृतीदिन/१४३१/२०२६, दि.१५/१०/२०२६**

**विषय :- २१ ऑक्टोंबर २०२६ रोजी पोलीस स्मृतीदिन पाळणेबाबत.**

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये कळविण्यात येते की, २१ ऑक्टोबर २०२६ बुधवार हा दिवस पोलीस स्मृतीदिन म्हणुन पोलीस आयुक्त कार्यालयाचे परेड मैदानावर सकाळी ०८:०० वा. आयोजित करण्यात आलेला आहे. त्याकरीता संबंधितांनी खालीलप्रमाणे त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे कार्यवाही करुन व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडिल पत्र क. **DGP** १६/१६/२०२४ **DESK** १६ मुंबई दिनांक २४/०९/२०२६ या सोबत जोडलेले **Director, intelligence Bureau, Ministry Of Home Affairs, New Delhi.** यांनी सुचित केलेल्या पोलीस स्मृतिदिन (ऑक्टोंबर २१) व एकता दिवस (ऑक्टोंबर ३१) अन्वये कार्यवाही करून त्याचा पुर्तता अहवाल ईकडील कार्यालयाच्या ईमेल कमांक cpnmsankirna@gmail.com वर सादर करावयाचा आहे.

**पोलीस स्मृतीदिन कार्यक्रमाचे नियोजनाची रूपरेषा व तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | संबधीत कामकाज करणारे अधिकारी | पुर्तता करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | परेड कमांडर | श्री. उमेश माने पाटील नेम. सपोआ विशेष शाखा. | दि.१३/१०/२०२६रोजी पासुन. |
| ०२ | प्रस्तावना सादर करणेकरिता व त्याचे निवेदन करणेसाठी नेमणुक करण्यात यावी. | मपोना/४४१, शुभांगी पाटील, नेम. विशेष शाखा. | दि.२१/१०/२०२६ रोजी पासुन. |
| ०३ | शहिदांचे नाव वाचन करणे करीता | १) श्री. भाऊसाहेब ढोले नेम. सपोआ. गुन्हे शाखा<br>२) श्री. बजरंग देसाई नेम .सपोआ प्रशासन | दि.२१/१०/२०२६रोजी |
| ०४ | संबंधित हुतात्मा यांचे शौर्या बाबतची माहिती नवी मुंबई. पोलीस आयुक्तालयाचे संकेत - स्थळ, | १) मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा<br>२) सहायक पोलीस आयुक्त, | दि.१९/१०/२०२६ रोजी पर्यत. |





| | | | |
|---|---|---|---|
| | व्टिटर अकांउट तसेच फेसबुकवर प्रसिध्द करणे | दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग | |
| ०५ | २१ ऑक्टोंबर २०२६, पोलीस हुतात्मा स्मृति दिनाचे कार्यक्रमाकरीता शहिद यांचे कुटूंबीय, (पत्नी व आई वडील) यांना उपस्थित राहण्याचे तोंडी निमंत्रण देण्यासाठी संबंधीत पोलीस ठाणे यांना बिनतारी संदेश पाठविणे. | पोलीस निरीक्षक , पोलीस कल्याण शाखा | दि.१९/१०/२०२६ रोजी पर्यंत. |
| ०६ | २१ ऑक्टोंबर २०२६, पोलीस हुतात्मा स्मृतीदिनाचे कार्यक्रमा-करीता मंडप आसन व्यवस्था करण्यात यावी. तसेच त्याबाबतचा आराखडा तयार करुनदि. १९/१०/२०२६ रोजी पर्यंत पोलीस उप आयुक्त, मुख्यालय यांना सादर करणे. | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. | दि.१९/१०/२०२६ रोजी पर्यंत. |
| ०७ | पोलीस स्मृतीदिन कार्यक्रमासाठी हुतात्मा यांना पुष्पचक्र अर्पण करणेकामी सदरचे पुष्पचक्र मान्यवर यांचेकडे देणेकामी पोलीस मुख्यालयातील पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात यावी. | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. | दि.२०/१०/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत |
| ०८ | २१ ऑक्टोंबर २०२६, पोलीस हुतात्मा कार्यक्रमाकरीता पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन हुतात्मा यांची नावे प्राप्त करुन घेणे. तसेच सदरची नावे वाचण्याकरीता पोलीस अधिकारी यांना देणे. | प्रशासकीय अधिकारी व प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा. | दि.२०/१०/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत. |
| ०९ | सदर कार्यक्रमाकरीता साउंड सिस्टिमची व्यवस्था करणे | सहा पोलीस आयुक्त, दळणवळण व महिती तंत्रज्ञान विभाग . | दि.२०/१०/२०२६रोजी १६.०० वाजेपर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | पोलीस स्मृतीदिन कार्यक्रमासाठी आयोजित करण्यात येणा-या परेडसाठी मैदानाची आखणी करण्यात यावी. ब्लॅक ॲम्युने- शनची व्यवस्था करण्यात यावी व पोलीस आयुक्त, कार्याल- यातील मैदानामध्ये एक शामियाना उभारण्यात यावा. | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. | दि.२०/१०/२०२६रोजी १६.०० वाजेपर्यंत |
| ११ | पोलीस स्मृतीदिन कार्याक्रमाचे फोटो काढण्याचे कामकाज करणेबाबत. | पोलीस निरीक्षक, प्रशासन, गुन्हे शाखा | दि.२०/१०/२०२६रोजी |
| १२ | पोलीस स्मृतीदिन कार्यक्रमा- करीता हुतात्मांना पुष्पचक्र अर्पित करण्या | १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय<br>२) पोलीस निरीक्षक,पोलीस | दि.२०/१०/२०२६रोजी १६.०० वाजेपर्यंत |





| | | | |
|---|---|---|---|
| | करीता पुष्पचक्र तसेच इतर साहित्यांची व्यवस्था करणे. | कल्याण शाखा | |
| १३ | दिनांक, २१/१०/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेले पोलीस स्मृतीदिन कार्याक्रिमाचे वेळी वाहतुक व बंदोबस्ताची व्यवस्था करावे. | पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा | दि.२१/१०/२०२६ रोजी |
| १४ | २१ ऑक्टोंबर २०२६, रोजी पोलीस स्मृतीदिन कार्यक्रमाचे वेळी वैद्यकिय अधिकारी आणि स्टाफ नेमण्यात यावा. | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. | दि.१९/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६ रोजी पर्यंत. |
| १५ | परेडमध्ये पोलीस अधिकारी /कर्मचारी यांचे ०२ प्लाटुन ठेवण्यात येईल. | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. | दि.२१/१०/२०२६रोजी |
| १६ | उपस्थितांना बैठक व्यवस्था करणेबाबत. | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. | दि.२१/१०/२०२६ रोजी |
| १७ | परेडची रंगीत तालीम बाबत देखरेख करणे. | पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, नवी मुंबई | दि.२०/१०/२०२६ रोजी |

नमुद पोलीस स्मृतीदिनाकरीता नवी मुंबई पोलीस आयुक्तालय आस्थापनवेरील सर्व सहायक पोलीस आयुक्त व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त कार्यालय नवी मुंबई येथील सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी/पोलीस अंमलदार व मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी हे दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ०७.३० वा. न चुकता पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथील परेड मैदानावर हजर राहतील.

**सोबत :- उपरोक्त संदर्भीय विषयाची प्रत पोलीस नोटीस सोबत ई मेल वर जोडण्यात आली आहे.**